महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: सीएमए-४२५/प्र.क्र.१४०/२०२५/जाहिरात दिनांक : २९ एप्रिल, २०२६

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय** :- बेलिफ-लिपिक, गट-क, नगरपाल (शेरीफ), मुंबई या संवर्गाच्या भरतीप्रक्रियेसंदर्भात.

**संदर्भ** :- (१) शासन पत्र विधी व न्याय विभाग क्र.याचिका-१८२५/प्र.क्र.१३८/का-९, दिनांक २८ एप्रिल, २०२६

(२) आयोगाची महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा योजना, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४.

(३) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ (जा.क्र.१२४/२०२५) संदर्भातील शुध्दीपत्रक दिनांक २५ मार्च, २०२६.

शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून प्राप्त मागणीपत्रानुसार आयोगामार्फत बेलिफ-लिपिक, गट-क, नगरपाल (शेरीफ), मुंबई या संवर्गातील ०३ पदांचा समावेश संदर्भ क्र.३ येथील शुद्धीपत्रकानुसार महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ च्या जाहिरातीमध्ये (जा.क्र.१२४/२०२५) करण्यात आला आहे.

२. तथापि, संदर्भ क्र.१ येथील शासन पत्रान्वये प्रस्तुत संवर्गाच्या पदभरती संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल असून सदर याचिकेच्या सुनावणी दरम्यान दिलेल्या निर्देशानुसार बेलिफ-लिपिक या संवर्गाची स्वतंत्र भरती प्रक्रिया राबविण्याची तसेच सदर संवर्गाच्या ०३ पदांचे मागणीपत्र रद्द समजण्याबाबत शासनाने आयोगास विनंती केली आहे.

३. उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ मधील बेलिफ-लिपिक, गट-क, नगरपाल (शेरीफ), मुंबई या संवर्गाची ०३ पदे रद्द करण्यात येत आहेत. प्रस्तुत संवर्गाची स्वतंत्र भरती करण्याकरीता महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा योजनेमधून सदर संवर्ग वगळण्याबाबत आवश्यक ती सुधारणा करून या संवर्गाच्या स्वतंत्र भरती प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्दिपत्रक लवकरच आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सं. पां. देशमुख
उप सचिव (जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.